# २७. लघवी अडकणे

(मूत्र संस्थेचे आजार)

| अनु.क्र. | लिंग/वय | विशेष बाबी | आजार |
|---|---|---|---|
| १. | **एक–दोन वर्षांची मुले** | लघवी थेंबथेंब पडते, शिश्नावरच्या त्वचेचा फुगार | शिश्नावरच्या त्वचेचे छिद्र बारीक असणे |
| २. | **एक–दोन वर्षांची मुले** | थेंबथेंब, कुंथावे लागते, मूत्राशय फुगते | मूत्रनलिकेच्या सुरुवातीस पडदा |
| ३. | **शालापूर्व आणि शाळकरी मुले मुली तसेच पुढील वयोगटातील व्यक्ती.** | कुशीवर, उताणे पडून लघवी होते, पण बसल्यावर अडकते. कधी ताप, लघवीतून पू, खर पडणे | मूत्राशयात मूतखडे |
| ४. | **तरुण पुरुषांचा आजार** | लघवीतून पू, मूत्रसंस्थेचा जंतुदोष, गुप्तरोग इत्यादीनंतर हा त्रास होतो. | मूत्रनलिका अरुंद होणॅ |
| ५. | **उतारवयातला पुरुषांचा आजार** | कुंथावे लागते, थेंबथेंब होते, गुदद्वारातून तपासणी केल्यावर घट्ट गड्डा लागतो. | प्रॉस्टेट ग्रंथी वाढणे |
| ६. | **गरोदरपणाचे पहिले तीन महिने** | पहिल्या तिमाहीनंतर त्रास थांबतो | गर्भाशयाचा दाब |
| ७. | **चाळीशीनंतरच्या स्त्रियांमध्ये** | गर्भाशय, योनिमार्गाची त्वचा बाहेर पडण्याची तक्रार | अंग (गर्भाशय) बाहेर पडणे |
| ८. | **उतारवयात तज्ज्ञाकडून तपासणी आवश्यक** | कर्करोग ज्या अवयवाचा कर्करोग असेल त्याप्रमाणे त्रास–तक्रारी असतात. | गर्भाशय, मूत्राशय, गुदाशय, यांचा कर्करोग. |

१. याची माहिती पुरुष जननसंस्थेच्या प्रकरणात दिली आहे.

२. याची माहिती गरोदरपणा व प्रसूती या प्रकरणात दिली आहे.

३. याची माहिती स्त्रियांच्या आजारांच्या प्रकरणात दिली आहे